सातारा जिल्हा परिषद सातारा

दूरध्वनी क्रमांक ०२१६२/२३८१२६ Email-dyceogadstr@gmail.com

पाहिजेत

सातारा जिल्हा परिषद सातारा अंतर्गत जिल्हा व तालुका क्षेत्रिय स्तरावरील विविध न्यायालयीन प्रकरणांमध्ये सातारा जिल्हा परिषदेची बाजू विविध स्तरावरील न्यायालयामध्ये प्रभावीपणे मांडण्यासाठी तसेच विविध न्यायालयातील सर्व प्रकरणांच्या कायदेविषयक बाबी बाबत न्यायालयीन प्रकरणी, सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे कामी सातारा जिल्हा परिषदेमध्ये विधी तज्ञ पॅनेलवर विधी तज्ञांची नियुक्ती करावयाची आहे. त्यासाठी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहे.

विधी तज्ञ पॅनलवर विधी तज्ञांच्या नियुक्तीबाबतच्या अटी व शर्तीबाबत सविस्तर जाहिरात व विहीत अर्जाचा नमुना सातारा जिल्हा परिषदेच्या www.zpsatara.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. तरी इच्छुकांनी आपले अर्ज दि. २१ /०७/२०२३ रोजी संध्याकाळी ५.४५ वाजेपर्यंत सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद सातारा यांच्या कार्यालयाच्या नोंदणी शाखेमध्ये पोहोचतील अशा बेताने पाठवावेत. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

ठिकाण - सातारा

दिनांक- ०७/०७/२०२३

स्वाक्षरी/-
ज्ञानेश्वर खिलारी भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद सातारा.

जाहिरात

सातारा जिल्हा परिषद सातारा

सामान्य प्रशासन विभाग.

सातारा जिल्हा परिषद सातारा अंतर्गत जिल्हा व तालुका स्तरावरील विविध न्यायालयीन प्रकरणांमध्ये जिल्हा परिषदेची बाजू विविध स्तरावरील ( मे. सर्वोच्च न्यायालय, मे. उच्च न्यायालय, मे. कॅट/मॅट कोर्ट, मे. जिल्हा / तालुका न्यायालय इ.) न्यायालयामध्ये प्रभावीपणे मांडण्यासाठी तसेच विविध न्यायालयातील सर्व प्रकरणांच्या कायदे विषयक बाबी बाबत/न्यायालयीन प्रकरणी, सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे न्यायालयीन कामकाजाकरीता विधी तज्ञ पॅनेल वर खालील प्रमाणे विधी तज्ञांची नियुक्ती करावयाची आहे. त्यासाठी विधी तज्ञ पॅनेलवर खालील प्रमाणे विधी तज्ञ नियुक्तीसाठी इच्छूक उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | न्यायालय | अर्जदारासाठी आवश्यक अनुभव |
|---|---|---|
| १ | मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली | मा. सर्वोच्च न्यायालयात १० वर्ष |
| २ | मा. उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद व नागपूर | मा. उच्च न्यायालयात १० वर्ष |
| ३ | मा. कॅट/ मॅट कोर्ट मुंबई | मा. कॅट/ मॅट न्यायालयात १० वर्ष |
| ४ | मा. जिल्हा न्यायालय सातारा वरिष्ठ स्तर / कनिष्ठ स्तर | मा. जिल्हा न्यायालय १५ वर्ष |
| ५ | मा. कामगार/औद्योगिक न्यायालय सातारा | मा. कामगार/औद्योगिक न्यायालय१५ वर्ष |
| ६ | मा. तालुका न्यायालय (प्रत्येक तालुक्यासाठी) | मा. स्थानिक कोर्टात २० वर्ष. |

**अटी व शर्ती.**

१) अर्जदार हा भारताचा नागरीक असावा.
२) मान्यता प्राप्त विद्यापिठाची विधी शाखेची पदवी असावी.
३) अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास अर्जदाराचे वय किमान ३३ वर्ष पूर्ण असावे.
४) अर्जदार यांनी सनद धारण केलेली असावी.
५) अर्जदाराचा वकील व्यवसायाचा वरील तक्त्याप्रमाणे अनुभव आवश्यक राहील.
६) अर्जदारास मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक.
७) जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक न्यायालय कामकाजाकरीता स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे. तथापि एकापेक्षा अधिक न्यायालयासाठी निवड केली जाणार नाही.
८) अर्जदारास फौजदारी गुन्हा विषयक, सेवाविषयक,प्रशासकिय, दिवाणी व महसूल विषयक अशा प्रकारच्या कायद्याची स्थिती विभागीय चौकश्या इत्यादी बाबतीत पुरेसे ज्ञान संपन्न असावा.

**अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे.**

१) शैक्षणीक अर्हतेसंदर्भात सर्व कागदपत्रे, विधी शाखेचे प्रमाणपत्र, बार कौन्सिलचे प्रमाणपत्र, (सदर कागदपत्रांची अर्जासोबत साक्षांकित प्रत सादर करण्यात यावी)
२) वयाच्या पुराव्याकरीता माध्यमिक शाळा उत्तीर्ण प्रमाणपत्र अथवा इतर समकक्ष पुरावा.
३) न्यायालयामध्ये दावे चालविण्याचा विहीत अनुभव असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करावे.
४) उमेदवारांनी त्यांचे अनुभवाबाबतचे स्व-साक्षांकनाचे घोषणापत्र सादर करावे.

**निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया**

१) प्राप्त अर्जाची छाननी करुन मुलाखतीसाठी पात्र अर्जदारांची मुलाखतीची यादी या सातारा जिल्हा परिषद, सातारा यांच्या वेबसाईटवर www.zpsatara.gov.in प्रसिध्द केली जाईल. तसेच अर्जदारांना त्यांच्या ईमेल आयडी वर कळविण्यात येईल.
२) अर्जदारांची निवड ही मुलाखती व्दारे करण्यात येईल. मुलाखतीचा दिनांक उमेदवारांना त्यांनी नमूद केलेल्या ईमेल आयडी वर कळविण्यात येईल.

३) मुलाखतीस जे उमेदवार उपस्थित राहणार नाहीत, अशा अर्जदारांचा पुन: मुलाखतीसाठी विचार केला जाणार नाही.

४) मुलाखतीस येताना मुळ कागदपत्रे आणणे आवश्यक आहे.

५) अर्जदार यांना मुलाखतीस येताना कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च अनुज्ञेय राहणार नाही.

६) विधी तज्ञ पॅनल निवडीसाठी गठीत केलेल्या समिती मार्फत मुलाखतीव्दारे उमेदवारांची निवड केली जाईल. मुलाखतीचे गुणांकन करताना विचारात घ्यावयाच्या बाबी व कोणत्या बाबीस किती गुण द्यावेत हे ठरविण्याचा तसेचे विहीत पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून योग्य उमेदवार निवडी बाबत संपूर्ण अधिकार निवड समितीस राहील.

७) विधी तज्ञ पॅनेलवर निवडीची प्रक्रिया कोणत्याही स्तरावर स्थगित करणे/ तहकूब करणे/ रदद करणेचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. सातारा यांचेकडे राखीव राहतील.

**वकील फीचे दर व त्याबाबतचे निकष.**

विधी तज्ञ पॅनेल वरील निवड केलेल्या वकीलांना खालील प्रमाणे वकील फी अनुज्ञेय राहील.

**वकील फीचे दर व त्याबाबतचे निकष खालील प्रमाणे असतील.**

| अ.क्र. | कामकाजाची बाब | वकील फी (प्रती दावा) | इतर खर्च (प्रती दावा) | एकूण (प्रती दावा) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली | ५००००/- | १५०००/- | ६५०००/- | दावा दाखल केल्यावर ५० टक्के निकालानंतर ५० टक्के |
| २ | मा. उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद व नागपूर | २००००/- | ५०००/- | २५०००/- | दावा दाखल केल्यावर ५० टक्के निकालानंतर ५० टक्के |
| ३ | मा. कॅट/ मॅट कोर्ट मुंबई | २००००/- | ५०००/- | २५०००/- | दावा दाखल केल्यावर ५० टक्के निकालानंतर ५० टक्के |
| ४ | मा. जिल्हा न्यायालय सातारा वरिष्ठ स्तर / कनिष्ठ स्तर | १५०००/- | ३०००/- | १८०००/- | दावा दाखल केल्यावर ५० % निकालानंतर ५० % |
| ५ | तालुकास्तर दिवाणी न्यायालय | १००००/- | २०००/- | १२०००/- | दावा दाखल केल्यावर ५० % निकालानंतर ५० % |
| ६ | मा. कामगार/औद्योगिक न्यायालय सातारा | १००००/- | २०००/- | १२०००/- | दावा दाखल केल्यावर ५० % निकालानंतर ५० % |
| ७ | कायदेविषयक अभिप्राय देणे. | १५००/- (Minor बाबीसाठी) | - | ३०००/- (Major बाबीसाठी) | कार्यवाहीनंतर आदा करणे |
| ८ | कायदेशीर नोटीस देणे अथवा नोटीसीस उत्तर देणे | ३०००/- | ५००/- | ३५००/- | कार्यवाहीनंतर आदा करणे |
| ९ | स्थानिक न्यायालयात कॅव्हिएट दाखल करणे | ३०००/- | - | ३०००/- | प्रति कॅव्हिएट खर्चासह कार्यवाहीनंतर आदा करणे. |
| १० | रिट याचिकेचे पॅरावाईज उत्तर तयार करणे. | ५०००/- | - | ५०००/- | कार्यवाहीनंतर आदा करणे |

**सदर बाबत इतर अनुषंगिक बाबी पुढील प्रमाणे राहतील.**

१) ज्या दाव्यामध्ये जिल्हा परिषद वादी असेल त्या दाव्यामध्ये वरील प्रमाणे फी अनुज्ञेय राहील.

२) ज्या दाव्यामध्ये जिल्हा परिषद प्रतिवादी असेल अशा दाव्यामध्ये वरील मानधनामध्ये २० टक्के कमी करणेत येईल.

**३) एकसारख्या (IDENTICAL) स्वरुपाची दोनपेक्षा अधिक प्रकरणे असतील तर अशा न्यायालयीन प्रकरणामध्ये सदर न्यायालयाकरीता देय असलेल्या वकील फी नुसार जास्तीत जास्त दोन न्यायालयीन प्रकरणा इतकी वकील फी देय राहील.**

४) वकील फी व खर्चाच्या रकमा वरील तक्त्यात संबंधीत बाबीसमोर नमूद केल्याप्रमाणे आदा करण्यात येतील. वकील पत्र दाखल करुन लेखी म्हणणे (शपथपत्र) दाखल केल्यानंतर प्रथम ५० टक्के अंतिम निकालानंतर ५० टक्के रक्कम आदा करण्यात येईल. तसेच दावा दाखल झालेल्या सुरुवातीच्या काळात पक्षकाराने दावा काढून घेतल्यास ५० टक्केच रक्कम आदा करण्यात येईल. परंतु दाव्याच्या शेवटच्या स्टेज पर्यंत दावा काढून घेतल्यास पूर्ण रक्कम आदा करण्यात येईल. दावा निकाली झाल्यानंतर दाव्याची प्रमाणित प्रत (सर्टीफाईड कॉपी) देण्याची जबाबदारी पॅनेलवरील वकीलांची राहील.

५) उपरोक्त नमूद अनुज्ञेय खर्चामध्ये कोर्टात सादर करावयाचे लेखी म्हणणे, जादा म्हणणे, दावा दुरुस्ती व वकीलांनी कोर्टात सादर करावयाचे अर्जाचे टायपिंग, निकालाची प्रत मागून घेणे याचा समावेश इतर खर्चामध्ये आहे. जि.प.च्या वतीने रिट याचिका दावा किंवा अपील दाखल करताना कोर्ट फी भरावी लागत असल्यास ती अतिरिक्त देय राहील.

६) सुपूर्द केलेल्या प्रकरणानुसार काही वेळा वकीलांना कार्यक्षेत्राबाहेरील कोर्टात उपस्थित राहून काम पहावे लागते अशा प्रकरणी प्रवास भत्ता, दैनिक भत्ता वकील फी व्यतिरिक्त देय राहील. सदर भत्ता जिल्हा परिषदेकडील वर्ग 2 च्या अधिकाऱ्यांना देय असलेल्या दराने अदा करण्यात येईल. मात्र अशा प्रकरणी त्यांना नियुक्त केलेल्या कार्यक्षेत्राबाहेर न्यायालयात उपस्थित राहणेबाबत संबंधीत खाते प्रमुखांची पूर्व संमती घेणे आवश्यक राहील.

७) जि.प.च्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे व संवेदनशील दाव्यामध्ये तसेच वर नमूद फी मध्ये प्रकरण परत्वे वाढ करणेचे अधिकार मा. स्थायी समितीस राहतील, पॅनेलमधील विशीष्ठ वकील अथवा पॅनेलव्यतिरिक्त विधीज्ञांची (वकीलांची) नियुक्ती करण्याचा व त्याची फी ठरविण्याचा अधिकार मा. स्थायी समितीला राहील.

८) **कोणत्या वकीलास कोणते व किती दावे द्यायचे याचा सर्वस्वी अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यांना राहील.** या संदर्भात सर्व वकीलांना समसमान पध्दतीने अथवा विशीष्ठ विभागांचे दावे विशीष्ठ वकीलांकडे देणे अथवा विशीष्ठ स्वरुपाचे दावे विशीष्ठ वकीलांकडे देणे यापैकी यथोचित कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

**विधी तज्ञ पॅनेलवर नियुक्त वकीलांचे कर्तव्ये व जबाबदाऱ्या**

१. सातारा जिल्हा परिषदेकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत/न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

२. जिल्हा परिषद हिताचे संवर्धन होईल या दृष्टीने प्रशासकिय बाबींचे माहिती घेवून त्यास आवश्यक तो कायदयाचा आधार देवून जिल्हा परिषदेची बाजू पूर्ण प्रभावाने न्यायालयात मांडणे.

३. सेवा विषयक/प्रशासकिय बाबी/विभागीय चौकशी तथा समकालीन कायदयाची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

४. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढणेसाठी सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र संबंधीत अधिकाऱ्याचे मदतीने तयार करणे.

५. जिल्हा परिषदेच्या हिताच्या दृष्टीने प्रकरणाबाबतचा आवश्यक ती गोपनियता बाळगणे.

६. पॅनेलवर नियुक्त वकीलांना जिल्हा परिषद वादी/प्रतिवादी असलेल्या प्रकरणी म्हणजेच जिल्हा परिषदेच्या विरोधात वकीलपत्र घेता येणार नाही.

७. जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे, अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन, तदनुषंगाने अपील दाखल करण्याचे संदर्भात उचित कार्यवाही करणे.

८. पॅनेलवरील एखादा वकील त्यांच्यावर सोपविलेली जबाबदारी पुरेशा प्रभावीपणे मांडत नसल्याची बाब निदर्शनास आल्यास त्यांचे सदर प्रकरणातील वकीलपत्र रदद करण्यात येईल अथवा त्यांची पॅनेलवरील नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल.
९. पॅनेलवर नियुक्त वकीलांना केसचा विषय, केस संबधी विषयाच्या कामकाजातील नैपूण्य इ. बाबींचा विचार करुन केसेस सूपूर्द केल्या जातील.

१०. जिल्हा परिषद स्तरावर बोलविण्यात येणाऱ्या वकीलांच्या सभांना उपस्थित राहून त्यांच्याकडे सोपविलेल्या प्रकरणांच्या सद्यस्थिती विषयी माहितीचा अहवाल सादर करणे अनिवार्य राहील.
११. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा संबंधीत विभागाचे खाते प्रमुख यांनी एखादया दाव्या संदर्भात चर्चा करणेकामी उपस्थित राहणेबाबत सूचित केल्यास पॅनलवरील वकीलांना दिलेल्या वेळेत उपस्थित राहणे बंधनकारक राहील.
१२. न्यायालयीन प्रकरणासंदर्भात वेळोवेळी झालेल्या सुनावणीचा अहवाल संक्षिप्त स्वरुपात सात दिवसाच्या आत प्रत्येक सुनावणीनंतर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करणे बंधनकारक राहील.

**अर्जदारांना सर्वसाधारण सुचना:-**

१. अर्जाचा नमुना सातारा जिल्हा परिषदेच्या www.zpsatara.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.
२. विहीत नमुन्यातील अर्ज परिपूर्ण भरुन लिफाप-यावर उजव्या बाजूला ठळक अक्षरात विधी तज्ञ पॅनेल करीता नियुक्ती असे नमूद करुन त्यावर पुढील प्रमाणे पत्ता नमूद करावा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सातारा सामान्य प्रशासन विभाग या पत्यावर पोहोचतील अशा बेताने आर.पी.ए.डी. व्दारे समक्ष अथवा कुरिअर व्दारे दि. २१/०७/२०२३ पर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. विहीत कालावधीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.
३. सदर अर्जात अर्जदार यांनी त्यांचे संपूर्ण नाव, टपालाचा पूर्ण पत्ता , पिनकोडसह, भ्रमणध्वनी / दूरध्वनी क्रमांक, ईमेल आयडी, देणे आवश्यक आहे. शैक्षणीक अर्हता, अनुभव इत्यादी विषयक माहिती साक्षांकित प्रतीसह अर्जासोबत सादर करावी.

स्वाक्षरी/-
ज्ञानेश्वर खिलारी भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद सातारा.

**सातारा जिल्हा परिषद, सातारा अंतर्गत ------------न्यायालय वकील पॅनेल करीता नियुक्ती साठी अर्ज.**

प्रति,

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद सातारा

विषय- जिल्हा परिषद, सातारा वकील पॅनेलवरील नियुक्ती बाबत .

अ) अर्जदार यांची वैयक्तीक माहिती.(योग्य असेल त्या ठिकाणी ( ) खूण करावी)

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे संपूर्ण नाव | (मराठीत) |
| | | (इंग्रजीत) |
| २ | पत्रव्यवहाराचा पत्ता | |
| ३ | कायमचा पत्ता | |
| ४ | दूरध्वनी क्र | |
| | मोबाईल क्र | |
| ५ | आधार क्रमांक | |
| ६ | पॅन क्रमांक | |
| ७ | ईमेल आयडी | |
| ८ | राष्ट्रीयत्व | |
| ९ | जन्म दिनांक | |

ब)अर्जदार शैक्षणीक माहिती.

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नाव (विद्यालय /महाविद्यालय) | बोर्ड/विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

इतर अहर्ता

| | | |
|---|---|---|
| १) | संगणक परीक्षा उत्तीर्ण आहे काय | |
| २) | भाषेचे ज्ञान<br>१. मराठी<br>२. हिंदी<br>३. इंग्रजी | <br>मौखिक लेखी<br>मौखिक लेखी<br>मौखिक लेखी |

व्यावसायिक पात्रता

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | सनद घेतल्याचा दिनांक | | | |
| २) | पुढीलपैकी कोणत्या न्यायालयीन प्रकरणामध्ये काम करणेस इच्छुक आहे | आस्थापना-<br>दिवाणी -<br>फौजदारी -<br>औद्योगिक - | | |
| ३) | अन्य जिल्हा परिषदेच्या वकील पॅनलवर काम केले असल्यास त्याचा तपशील | | | |
| ४) | वकील व्यवसायाचा अनुभवाचा तपशील | अ.क्र. | न्यायालयाचे नाव | केसेसचा प्रकार |
| | | | | |

अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी यान्द्वारे प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांवर व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड/ नियुक्ती रदद केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पूर्णत: जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबतीत माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन, तसेच मी निवड पक्रियेत कोणत्याही प्रकारची वशीलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

ठिकाण

दिनांक अर्जदार स्वाक्षरी.

**SATATA ZILLA PARISHAD SATARA**
**APPLICATION FORM FOR APPOINTMENT OF ADVOCATE ON *ADVOCATE PANNEL* OF SATARA ZILLA PARISHAD FOR ---------- COURT**

TO

Chief Executive Officer
Zilla Parishad Satara.

Sub- Regarding Appointment on pannel of advocate Zilla Parishad Satara.

A) Personal Information of applicant (make () where necessary.

| | | |
|---|---|---|
| १ | Name of applicant | (Marathi) |
| | | (English) |
| २ | Postal adress | |
| ३ | Permenant adress | |
| ४ | Phone no. | |
| | Mobile No. | |
| ५ | Adhar card no. | |
| ६ | PAN No. | |
| ७ | Email adress | |
| ८ | Nationality | |
| ९ | Date of Birth. | |

B) Educational Qualification

| Education | Name of School/college | Board/Univercity | Date of Passing | Marks obtained | Percentage |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

Other Qualification

| | | |
|---|---|---|
| १) | Whether applicant posses required computer knowledge. | |
| २) | Knowledge of languages<br>Marathi<br>Hindi<br>English | <br>Oral Writing<br>Oral Writing<br>Oral Writing |

Professional Qualification.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | Date of Sanad. | | | |
| २ | In which types of court matter wants to work | Establishment<br>Civil -<br>Criminal -<br>Industrial - | | |
| ३ | Information if worked on other Zilla Parishad advocate Pannel | | | |
| ४ | Professional Experience | Sr.no. | Name of court | Types of cases |
| | | | | |

AFFIDAVITE TO BE GIVEN BY APPLICANT.

I__________________________ do here by solemnly declare that the above information is provided faithfully and trustworthy being true.I am eligible as per norms and education qualification given in advertisement the information given in the application seems to be falls and there by my application rejeted or my selection is cancelled at any stage of selection, there upon in this regard I shall not complaint. The information provided by me seems to be false or untrue, then it shall be my total responsibility and shall be liable for legal action.I shall be disqualified, if I use any sort of illegal means and pressure.

Place

Date signature of applicants.